# " वर्षा ऋतू "

उन्हाळ्याच्या त्रासाने सर्व धरती करपून गेली असते. उष्णतेने सर्वांगाची लाही लाही होत असते अन् अशा वेळी " पावसाच्या धारा । येती सरसरा । झाकाळले नभ । सोसाट्याचा वारा ॥ अशा तऱ्हेने वर्षाराणीचे आगमन होते. अन् होरपळलेल्या मनावर शीतल, थंडगार झुळूक फुंकर घालते. लख्ख निसर्ग पावसाने न्हाहून स्वच्छ होतो. पक्षी, झाडे, माडे आसुसलेली मने साऱ्यांवर आनंदाची बरसात होते. विजेचे नर्तन, मेघांचे गर्जन, मुसळधार पाऊस, सर्व वातावरणास लपेटून राहणारा गारवा या साऱ्याच गोष्टी मला खूप आवडतात. आणि म्हणूनच माझा आवडता ऋतू आहे " वर्षा ऋतू " !!

पावसाळा सुरू झाला की सारे वातावरणच बदलून जाते. नद्या दुथडी भरून वाहू लागतात. राने हिरवीगार दिसतात. गवताच्या हिरव्या लाटा वाऱ्यावर डोलू लागतात. त्यातील रंगीबेरंगी रानफुले मनाला मोहवून टाकतात. सारी सृष्टी जणू काही हिरवा शालू नेसून सजली आहे असे वाटते. चराचर चैतन्याने न्हाऊन निघते. म्हणूनच कवी बा. भ. बोरकर लिहितात " गडद निळे गडद निळे जलद भरुनी आले " आणि बालकवी फार सुंदर वर्णन करतात -

" हिरवे हिरवे गार गालीचे, हरित तृणांच्या मखमालीचे "

पावसाळ्याने एक उसळता उत्साह व चैतन्य साऱ्या माणसांमध्ये भरून जाते. " श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे । क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे ॥ असे बालकवींनी पावसाचे यथार्थ वर्णन आपल्या कवितेतून केले आहे. या दिवसात आकाशात इंद्रधनुचा मनमोहक गोफ विणलेला पाहायला मिळतो. डोंगर

AIT Global India Pvt. Ltd.

प्राचूचे वैभव मिरवीत असतात. त्यातच मधून मधून दुग्धसागरासम धबधबे कोसळतांना दिसतात. असे वाटते की, जणू मोत्यांच्या माळांनी डोंगर रांगांनी शृंगार केला आहे.

या पावसात नखशिखांत भिजणे हा माझ्या आनंदाचा ठेवा आहे. पावसाच्या धारा अंगावर झेलीत मुक्तपणे भिजणे म्हणजे पाऊस उपभोगणे होय. हा वर्षाऋतू शेतकऱ्यांसाठी आवश्यकच असतो त्यामुळे त्यांनाही तो प्रियच असतो. या ऋतुत निसर्ग रंग, रूप, गंध यांची आरास मांडतो. सगळ्या सृष्टीला वैभवाचे लेणे बहाल करतो. शेतातील तुऱ्यांना श्रावणातील सोनेरी ऊन नव्याने तजेला देते. म्हणूनच मला वर्षा ऋतू हा जीवनदायी ऋतू वाटतो. आनंद आणि सौंदर्याचा सुंदर मिलाफ या ऋतूत बघायला मिळतो. म्हणून मला हा ऋतू आवडतो !!

पण कधी कधी अती पाऊस उच्छाद मांडतो. पूर येतात, दरड कोसळते, तेव्हा पावसाची, अर्थात वरुण राजाची विनवणी सुद्धा करते !! प्रमाणातच पाऊस पडू दे सगळ्यांनाच त्याचा आनंद लुटू दे.



सौ निलीमा विनोद जोशी
मोबा.नं: ९१-९८६७८५९०३९